प्रकरण पहिले

एकोणिसाव्या शतकामधील वाङ्‌मयीन वातावरण

वाङ्‌मय विषयक भूमिका व स्वरूप

वाङ्‌मय निर्मितीच्या प्रेरणा :

वाङ्‌मयनिर्मिती ही अलौकिक घटना नसते. ज्या मानवी जीवनातून ती निर्माण होते, त्या जीवनाचेही स्वरूप एकसाची असे नसते. राजकीय जीवन, धर्मकारण, समाजकारण, अर्थकारण अशा नानाविध क्षेत्रांशी त्यांचा संबंध असतो. त्या सर्वांच्या परस्पर संबंधातून कमी अधिक परिणामातून त्या त्या युगातील समाजाचे पर्यावरण तयार होत असते. वाङ्‌मयीन वातावरण हे देखील त्या पर्यावरणाचाच एक भाग असते. म्हणून एकोणिसाव्या शतकामधील वाङ्‌मय निर्मितीच्या प्रेरणा ज्या पर्यावरणात आहेत, त्याचा शोध घेणे आवश्य ठरते.

राजकीय व सामाजिक वातावरण :

या कालखंडातील वाङ्‌मयीन वातावरणाच्या स्वरूपाचे आकलन होण्या साठी त्या कालखंडातील राजकीय व सामाजिक वातावरणाचा विचार करणे आवश्यक ठरते. तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती, राज्यकर्त्यांची संस्कृती, जीवनदृष्टी व उद्दिष्टे एतद्देशी-

यांवर त्यांचा झालेला परिणाम याचा यासाठी साकल्याने विचार करावयास हवा. तो करीत असताना पार्श्वभूमीदाखल ब्रिटिश अंमलपूर्व काळातील सामाजिक जीवनाचा ही थोडा मागोवा घेणे क्रमप्राप्त ठरते. इंग्रजांच्या आगमनापूर्वी भारतीय जीवनात ठळकपणे व सातत्याने जाणवणारी गोष्ट म्हणजे सर्व क्षेत्रांतील स्थितिशीलता, अनेक स्वकीय व परकीय राजवटी येथे आल्या व गेल्या, पण एतद्देशीयांच्या जीवनविषयक दृष्टीकोणात म्हणण्यासारखा बदल घडून आला नाही. धर्मकल्पना, अर्थजीवन, ग्रामजीवन व सामाजिक व्यवहाराचे संकेत यात दीर्घकाळापर्यंत मध्ययुगील संस्कृतीचेच वर्चस्व राहिले.

धर्मकारण, समाजकारण, देशकारण, राजकारणादी क्षेत्रे त्या काळी आजच्यासारखी वेगळी मानली जात नव्हती. धार्मिक क्षेत्रांत काही आंदोलने निर्माण होत. पारलौकिक क्षेत्रापुरते व्यक्ति विमोचन घडण्यास या चळवळीचा थोडा फार उपयोगही होई. परंतु या चळवळींना भौतिक जीवनातील उन्नतीची साथ न मिळाल्यामुळे येथील जीवन विपन्नच राहिले. पारमार्थिक वाटचालीला पोषक असे काही वाङ्मय यातून निर्माण झाले. भारतीय जीवनातील कर्मठपणा व मिथ्याचार दूर करण्यास त्या वाङ्मयाचे काही अंशी सहाय्य झाले हे खरे, पण ते पारंपरिक, बोधप्रचुर स्वरूपाचेच राहिले, उदा. हरि केशवजी यांचे "यात्रिकक्रमण" (१८४१) हा भाषांतरित गोष्टीरूप ग्रंथ सरस असला तरी ती स्वतंत्र निर्मिती नाही.

परंतु एकोणिसाव्या शतकामध्ये या साऱ्यात क्रांतिकारक व वेगवान बदल घडून येण्याची शक्यता प्रथम निर्माण झाली ती ब्रिटिश आमदानीतच. ब्रिटिश संस्कृती मुख्यत: विज्ञाननिष्ठ, नागर व उद्योगप्रवण होती, तर त्या

उलट आपली संस्कृती ही पारमार्थिक, कृषिप्रधान ग्रामीण होती. कृषिप्रधान संस्कृती स्थितिशील, दैववादी व संकुचित असते तर औद्योगिक संस्कृति गतिशील, प्रयत्नवादी व व्यापक दृष्टीची असते. इंग्रजपूर्व राजवटीतील सांस्कृतिक वाड्:मयीन परिस्थितीचा विचार करता असे दिसते की, एकंदर हा काळ धामधुमीचा होता. शैक्षणिक साधने फार मर्यादित व ती ही मुठभर लोकांच्या हाती होती. भोगप्रियतेला उत्तेजन देणारे वाड्.मय सोडले तर नव्या वाड्:मयाला प्रेरणा देण्याजोगे प्रयत्न तत्कालीन परिस्थितीत घडत नव्हते. सारे वाड्:मय साचेबंद व एकारलेले असून त्यावर पारमार्थिकतेची दाट सावली पडली होती. पद्याच्या मानाने गद्याची निर्मिती फार तोकडी होती.

ब्रिटिश राजवटीने येथील जनतेला एकछत्री अंमल, दळणवळणाच्या साधनांची वृध्दी, कायदा व सुव्यवस्था यांचे राज्य, शांतता, मुद्रणकला, आधिभौतिक संस्कृतीचा परिचय, संघटना, जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी, तिच्या आविष्काराची नवी साधने समाजातील सा-याच थरांना आत्मविमोचन करुन घेण्याची संधी इ. गोष्टी प्रथमच उपलब्ध करुन दिल्या. नवी धार्मिक, सामाजिक जागृती व त्यातून निर्माण झालेली नवी मूल्ये हे या कालखंडाचे आणखी एक वैशिष्टय होय. या अनुषंगाने भारतातील निरनिराळे वर्ग व समूह प्रथमच एकत्र आले. आणि त्यांच्या मनात एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचे बीजारोपण झाले. या कालखंडातील ही प्रक्रिया फार महत्वाची आहे. यामुळे लोकशाही, राजकीय हक्क, कायदेशीर चळवळ, संघटना इत्यादीच्या विचारांना अग्रस्थान प्राप्त झाले.

या कालखंडातील इंग्रजी भाषा व चालीरिती, शिक्षणसंस्था, मिशनरी हालचाली, व्यापारी उलाढाली, वृत्तपत्रे इत्यादीमुळे इंग्रजी संस्कृतीचे अव्वल

इंग्रजीतील सांस्कृतिक घडामोडीवर जसे परिणाम जाणवतात त्याचप्रमाणे एल्फिन्स्टनची फार मोठी छाप जाणवते. कारण या काळातील सांस्कृतिक घडामोडींची सारी सुत्रे राज्यकर्त्यांच्या हातात होती व एल्फिन्स्टन हा मुंबई प्रांताचा इ.स. १८१९-२७ पर्यंत गव्हर्नर होता. तसेच एल्फिन्स्टन, मॅन्रो या सारखे अधिकारी उदारमतवादी होते. येथील शैक्षणिक, सांस्कृतिकदृष्टया मागासलेल्या जनतेसाठी काही करावे, अशी त्याची उत्कट इच्छा होती. म्हणून येथील जनतेत सुधारणा तर व्हावीच पण त्याचबरोबर त्यांना नव्या राजवटीचा परकीय पणाही जाणवू नये असे सहिष्णू धोरण त्यांनी आखले. मराठी माणूस हा इतर भारतीयांप्रमाणे स्वधर्माभिमानी तर असावाच शिवाय तो स्वभाषाभिमानी असावा अशी अपेक्षा आपणास चिपळूणकरांच्या निबंधमालेतील "मराठी भाषेची सांप्रतची स्थिती" या निबंधातून पहावयास मिळते. ते म्हणतात "जी भाषा बोलणा-यांनी दिल्ली अटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जींत तुकाराम, रामदासांसारख्या भगवत्परायण साधूंनी आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रंथीत केले. जीस मुक्तेश्वर, वामन पंडित, मोरोपंत इत्यादी कवींनी आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीने संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश गांभीर्य व सरसता या गुणांकरिता कोणत्याही अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाही. अशी आमची खात्री आहे."[१] यावरून मराठी भाषेचा त्यांना असणारा अभिमान त्यांच्या शब्दाशब्दांमध्ये ओतप्रोत भरलेला असल्याचे दिसून येते.

राजवट स्थिर करण्यासाठी केवळ कायदा व सुव्यवस्था करून भागणार नाही. हे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जाणले होते. स्वत:ची राजवट स्थिर करण्याच्या धोरणाचे हे जसे अंग होते तसेच त्याचे दुसरे अंग नवसंस्कृतीशी जनतेचा परिचय करून देणे हे होते आणि कोणत्याही नव्या संस्काराचे

बीजारोपण करण्याचे सर्वमान्य साधन शिक्षण हेच असल्याने एल्फिन्स्टनने वर दिलेल्या धोरणाच्या दोन्ही बाजू लक्षात घेऊन त्याने येथे नव्या शिक्षणाचा पाया घातला. या पायावरच आधुनिक काळातील मराठी वाङ्:मयाची इमारत उभारली गेली. १८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला एल्फिन्स्टनने शिक्षण विषयक धोरणातील बदल कळविले होते. यावरून असे दिसून येते की, इंग्रज राज्यकर्ते विद्या व कला यांचे भोक्ते होते. एल्फि-न्स्टनसारख्या राज्यकर्त्यांच्या भूमिकेवरून उक्ती-कृतीतून तत्कालीन राज्य-कर्त्यांची वाङ्:मयविषयक दृष्टी कशी होती, याची आपणास प्रचीती येते.

प्रस्तुत कालखंडाचे सर्वसामान्य स्वरूप:

प्रस्तुत कालखंड हा नव्या जुन्याचा संधिकाल आहे. त्याचप्रमाणे हे नव्यावाङ्:मयाच्या पूर्व तयारीचे युग होते. मराठीमधील नव्या वाङ्:मय प्रकाराची पहिली बीजे या काळात रूजलेली आहेत. १८५७ मध्ये बाबा पद्म-नजींची "यमुनापर्यटन" ही कादंबरी याच सुमारास प्रकाशित झाली. तसेच मराठीतील पहिले सामाजिक नाटक ही (व्यवहारोपयोगी नाटक १८५७ - गो.ना. माडगांवकर) याच सुमारास प्रकाशित झाले. नियतकालिके, निबंध, भाषांतरे, भावकविता इत्यादी ललित वाङ्:मयच नव्हे, तर चरित्रे, टीका इत्यादी वाङ्:मयप्रकारांचाही खराखुरा उन्मेष याच कालखंडात झाला. असे दिसून येईल. वरील विवेचनावरून असे दिसते की प्रस्तुत कालखंड हा एकूणच पूर्व तयारीचा कालखंडा होता. इंग्रजी वाङ्:मयाच्या अभ्यासामुळे आणि परिचयामुळे वाङ्:मय विकासाला बरीच जोराची गती मिळाली. व कांही नवीन वाङ्:मय प्रकारांचीही मराठी वाङ्:मयामध्ये भर पडली होती. वृत्तपत्र-लेखन, कथा, कादंबरी, निबंध, नाटक, प्रवासवर्णन, व्याकरण, शब्दकोश, वाङ्:मयकोश, चरित्र इ. वाङ्:मयप्रकार विकास पावत होते आणि प्रारंभी

म्हटल्याप्रमाणे प्रस्तुत कालखंड हा पुढे येऊ घातलेल्या नव्या युगाची पूर्व तयारी करीत होता. चिपळूणकर लोकहितवादी सारखे प्रभावी निबंधलेखन काही आकाशातून एकदम खाली आले नाहीत. त्यामागे वैचारिक लेखनाची केवढी तरी प्रक्रिया सुरु झाली होती. किर्लोस्करांची नाटके, हरिभाऊ आपटे यांचे कादंबरी वाङ्‌मय, केशवसुतांची नवीन कविता ह्या सर्व वाङ्‌मयाची पाळेमुळे याच कालखंडात रुजलेली होती. फुले, टिळक, आगरकरांसारख्या विचारवंतांच्या लेखनाची पूर्व तयारी ही याच कालखंडामध्ये झालेली होती.

इंग्रजी राजवटीच्या प्रथमावस्थेत मराठी भाषेच्या पायाभरणीचे जे कार्य झाले त्याची सुरुवात डॉ. केरीसारख्या मिशन-यांनी ब्रिटिश सरकारच्या आधी कितीतरी वर्षे केली होती. मराठीतील पहिले पुस्तक छापण्याचा मान मिशन-यांकडे जातो. पहिले मराठी व्याकरण, पहिला कोश, पहिले मुद्रणालय, पहिली स्त्रियांची शाळा इत्यादी ब-याच नव्या सांस्कृतिक घडामोडीच्या प्रवर्तनाचे पहिले वहिले श्रेय मिशनरी मंडळीकडे जाते. लोकांमध्ये वाचनाची अभिरुची निर्माण करण्यासाठी ग्रंथ छापून फुकट वाटावे लागले. नव्या अभिरुचीचा वाचकवर्ग तयार करावा लागला. या विषयी चिपळूणकर आपल्या "ग्रंथावर टीका" या निबंधात म्हणतात, "कारण एक तर ग्रंथ छापणे हे कोणी उगीच मौजेखातर करीत नाही. तो घेणारे कोणीतरी सापडतील. अशा समजुतीवरच कोणी ग्रंथकार आपले पुस्तक छापतो."[२]

तत्कालीन ग्रंथकाराची तसेच वाचकवर्गाची स्थिती कशी होती ते यावरुन पहावयास मिळते. त्यांच्या मनातील नव्या उपक्रमाबद्दलचा पूर्वग्रह दूर करण्यासाठी विदूरनीती, इसापनीती, पंचोपाख्यान, सिंहासनबत्तिशी यासारखी सोपी, रंजक व भारतीय वातावरण असलेली पुस्तकेच प्रथम छापावी लागली.

इंग्रजी राजवटीचे आगमन गद्याला प्रेरक ठरले. पद्याच्या मानाने पुष्कळच अधिक गद्य या काळात निर्माण झाले. कोणता लेखन प्रकार केव्हा बहराला येईल, याबद्दल काही निश्चित नियम सांगता येत नसला तरी प्रत्येक कालखंडात स्थूल मानाने कांही वृत्ती स्थिर होऊन महत्व पावतात. आणि वाङ्.मय निर्मितीवर त्याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम होतो. या दृष्टीने पाहता इंग्रजी राजवटीचा काळ भावनेपेक्षा बुध्दीवर, संश्लेषणापेक्षा विश्लेषणावर, आध्यात्मिक चर्चेपेक्षा भौतिक घडामोडीवर भर देणारा व ऐहिकतेला प्राधान्य देणारा ठरला. उपयुक्त ज्ञानाचा प्रसार हे या काळात विचारवंतांचे ब्रीद होते. यामुळेच इतिहास, भूगोल, विज्ञान, ऐहिक सुखाची महती, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा विचार इत्यादी गोष्टींना या काळात विशेष महत्व आले आणि याला प्रेरक होईल असेच वाङ्:मय निर्माण झाले. निबंध शास्त्रीयलेखन, चरित्र, स्थळवर्णन इ. गद्यवाङ्.मयाच्या शाखा पल्लवित झाल्या. या कालखंडातील गद्याची पायाभरणी करण्यासाठी दीर्घकाळ खटपट करावी लागली. कोश व व्याकरण यासारख्या भाषेच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी कराव्या लागणा-या धडपडीचे वर्णन मोल्स्वर्थ व दादोबा पांडुरंग यांनी अनुक्रमे आपल्या कोशाच्या प्रस्तावनेत केले. ते या काळातील विविध उपक्रमांची ओळख पटविते.

"मराठी प्रदेशातील वेगवेगळया विभागातून शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी जमा करण्याकरिता आम्हीं कांही ब्राह्मणांची योजना केली. त्यांना मिळालेल्या शब्दांमधून द्विरुक्ति स्वरुप किंवा अपभ्रंश स्वरुप किंवा इतर कांही कारणामुळे घेण्यास अयोग्य असे शब्द गाळून जवळ जवळ पंचवीस हजार शब्द उपलब्ध झाले. यातील कांही शब्द घेऊन आम्हां तिघांपैकी एकजण दररोज इतर सहा-सात-आठ ब्राह्मणांबरोबर चर्चा करीत असे. प्रत्येक शब्दाची व्याकरणांतील जाती, व्युत्पत्ती, लिंग, प्राथमिक आणि लाक्षणिक

अर्थ त्यांचा प्रसार, त्यांचे उच्चारलेखन या विषयी चर्चा होई. कांही अर्थाकरता उदाहरण वाक्ये तयार करण्यात येत. ज्यांची अधिक चर्चा व्हावी असे वाटे त्यांच्यावर तशा अर्थाची खूण करीत आणि त्याबाबत बहुतेक सारा विचार झाला असे वाटेपर्यंत त्याचा विचार झाला असे वाटे-पर्यंत त्याचा विचार होई. निर्णित झालेल्या गोष्टी लगेच मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये नोंदून ठेवण्यात येत. या शब्दांची नोंद अक्षार विल्याने झाली की तद्विषयक सर्व कागद निराळे ठेवण्यात येत हा एक विभाग झाला. दुस-या विभागामध्ये एका निवांत खोलीत आमच्यापैकी दुसरा कोणी एका ब्राह्मणांस घेऊन पत्रे, पुस्तके आणि कागद यांच्यामधून उपयुक्त शब्द, त्यांचा नवीन अर्थ, त्यांची नव्या त-हेची योजना, यांचा निर्णय करण्यास अधिकृत असे आधार हे शोधून काढण्याचे काम करीत असे. त्या इमारतीमधील अधिकएकान्तामधील खोलीत आम्हां तिघांपैकी तिसरा आणखी एक विशेष विद्वान ब्राह्मणांस बरोबर घेऊन जमलेल्या माहितीचे बलाबल पाहून संक्षेप करून सारे लिहून काढी. हे तिस-या विभागातील काम सर्वाधिक महत्वाचे आणि परिश्रमाचे असे. इकडे पहिल्या विभागातील अधिकारी पुढील अक्षार आणि तद्विषयक कार्य यांस प्रारंभ करी. शब्द जमा करणारे मधून मधून आपले शब्द घेऊन येत. त्यांच्या नवीन शब्दांची पुन: पाहणी व चर्चा होई. झालेल्या कामातील चुका दिसून येत. अधिक नेटके प्रतिशब्द किंवा अर्थ लापनिका सुचत. अधिक चांगली उदाहरणे तयार होत. अधिक निर्विवाद असे आधार सापडत हे होत आहे. तो बिनचूकपणा आणि निर्दोषता या काळामध्ये साधे. या पध्दतीने आमचे काम झाले आणि मूळ २५००० शब्दांची संख्या चाळीस हजारांपर्यंत (पहिल्या आवृत्तीत) गेली."[3]

स्वत:च्या भाषेच्या व्याकरणाचे अज्ञान असल्यास परकी भाषेचे व्याकरण अज्ञान असल्यास परकी भाषेचे व्याकरण कळणे कठीण आणि मग परकीय

भाषा ही आत्मसात करणे कठीण असे. या अर्थानेच दादोबांनी आपल्या व्याकरणाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे, "अलिकडे दोन तीन वर्षे झाली व्याकरणाची आवड मुलांमध्ये फार वाढत चालली आहे, ... व परभाषा शिकण्याकरता त्याचा उपयोग फार या सकल गोष्टींचा विचार मनात येऊन ग्रंथास आरंभ केला."[४]

ब्रिटिश राजवटीचा त्यांच्या वाङ्:मयाचा प्रभाव एतद्देशीयांच्यावर दिसून येतो. एकोणिसाव्या शतकातील वाङ्:मयीन वातावरणाचा मागोवा घ्यावयाचा झाल्यास ब्रिटिशांची शासन व्यवस्था, त्यांनी सुरु केलेल्या शिक्षणसंस्था, मुद्रणालयाची एतद्देशीयांना झालेली ओळख व त्याद्वारे प्रसारीत होणारे ग्रंथ, वृत्तपत्रे, निबंध, नियतकालिके यासारखे अगदी नव्यानेच वाङ्.मय प्रकार मराठीत रूढ होत होते, तर एकीकडे ख्रिस्तीधर्मोपदेशक त्यांनी धर्म प्रसारासाठी सुरु केलेले उपक्रम त्यांची सेवाभावी वृत्ती आणि एतद्देशीय लोक यांनी या अनुसंधानाने केलेल्या सामुदायिक किंवा व्यक्तिगत हालचाली या सर्वांच्या क्रिया प्रतिक्रियांतून या नव्या मूल्यांचे कमि जास्त प्रमाणात संवर्धन होत गेले. जीवनाच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अंगाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण एतद्देशीयांना प्राप्त झाला. या सर्वांचा वाङ्:मय निर्मितीवर परिणाम होत होता. असे असले तरी या भाषांतराच्या माध्यमातून जीवन विषयक आणि वाङ्:मय विषयक नव्या विचारांच्या व जाणिवांचा लाभ मराठी वाचकास झाला.

भाषांतर युग:

प्रस्तुत कालखंडास कित्येकवेळा "भाषांतर-युग" असेही संबोधिले जाते. याचे कारण उघडच आहे. या काळातील बरेच वाङ्:मय भाषांतर स्वरूपाचे आहे.

विशेषत: संस्कृत व इंग्रजी कवितांची, नाटकांची भाषांतरे करण्यात आली होती. या भाषांतरात वाङ्.मयाबरोबर शास्त्रीय स्वरूपाचे ग्रंथ ही झाले. ललित नसणाऱ्या वाङ्:मयाप्रमाणे ललित कथात्मक वाङ्:मय ही आले. इंग्रजीतून भाषांतर करण्यावर भर असला तरी संस्कृत आणि फारसी वाङ्. मयावरून ही भाषांतरे झाली. या संदर्भात लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, संस्कृत नाटक किंवा काव्य यांचा अनुवाद करण्याची कल्पना आधीच्या काळात कोणास सुचली वा रूचली नव्हती. ती या कालखंडात मान्य होऊन बहुतेक प्रसिध्द व रसिक मान्य नाटके व मेघदूत रघुवंशादी काव्ये मराठीत उतरली गेली. इंग्रजीतून कथा, नाटके व काव्य यांची मराठी भाषांतरे अर्थातच होत होती. स्टीफन्ससारख्या परकीयाला धर्म प्रसारासाठी का होईना व्याकरणाची गरज भासली म्हणून मराठीच्या भाषिक अभ्यासास पोषक व तिच्या स्वरूपास योग्य, शुध्द वळण मिळण्याच्या दृष्टीने लक्षात घेण्याजोगे प्रयत्न पूर्वी झाले नाहीत.

भाषेला मध्यवर्ती वळण देता देता शास्त्रीय ज्ञानदानाला योग्य अशी पाठ्यपुस्तके नव्हती ती या काळात तयार करून घ्यावी लागली. त्यासाठी भाषांतराचाच उद्योग हाती घ्यावा लागला. ग्रंथकारांना बक्षिसांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून हवे त्या प्रकारचे हुकूमी ग्रंथ लेखन करून घ्यावे लागले. हे कार्य कष्टाचे व खर्चाचे होते. याला संघटित व पध्दतशीर प्रयत्नांची गरज होती. सरकारच्या सूत्रबध्द प्रयत्नशिवाय हे अशक्य होते. हे सहाय्य अव्वल इंग्रजीतील राज्यकर्त्यांनी दिले व मराठी गद्याची पायाभरणी करण्यास मदत केली. या गद्यवाङ्:मयाचा प्रमुख हेतु ज्ञान संपादन व ज्ञानप्रसार हा होता. यामुळे नवी ज्ञानदृष्टी व जिज्ञासा निर्माण झाली.

संस्कृतातील किंवा इंग्रजीतील ग्रंथाची भाषांतरे मराठी भाषेत करण्याची

इच्छा त्याकाळच्या लेखकांना झाली. याचे मोठे कारण म्हणजे या काळात झालेले विद्येचे पुनरुज्जीवन. विद्याप्रेमी इंग्रजांच्या प्रोत्साहनाने व पुरस्कारामुळे एक नवे प्रबोधन महाराष्ट्रात घडून आले. संस्कृत विद्येचा व वाङ्:मयाचा जुनाच ठेवा पुन: नव्या दृष्टिकोणाने व नव्या उत्साहाने अभ्यासावा असे नवशिक्षितांना वाटू लागले. लोक जागृती व ज्ञानप्रसार या दृष्टीनी नव्या नव्या शैक्षणिक व सामाजिक कार्यांना जोराने चालना मिळाली. परकीय इंग्रजी भाषेतील वाङ्:मयाशी ही क्रमाक्रमाने परिचय वाढत जाऊन त्याच्या ही अभ्यासाची आवड लोकांच्यात निर्माण झाली. या सर्वांचा परिणाम समाजाच्या कलाविषयक अभिरुचीवर कळत-न-कळत परंतु अपरिहार्यपणे झाला मराठीमध्ये आतापर्यंत भक्तीसारख्या एकाच विषयाला धरून एका ठराविक प्रकाराचेच वाङ्:मय ठराविक छंदाच्या माध्य-मातून निर्माण झाले असल्याची जाणीव नव्यांना झाली. मातृभाषेचा वाङ्.मयीन विकास साधावयाचा असेल तर नवनवीन वाङ्.मय प्रकार यापुढे मराठीत निर्माण होणे आवश्यक होते. परंतु कथा, नाटक, चरित्र, इतिहास इ. लौकिक वाङ्:मयप्रकारांना साजेल अशी स्वतंत्र गद्य मराठी शैलीच अस्तित्वात नव्हती. अशावेळी स्वतंत्र रुपाने लिहिण्यापेक्षा भाषांतराचाच अवलंब प्रामुख्याने केला गेला. ही गद्यशैली दोन अंगानी विकसित होत होती. व्यवहारोपयोगी मराठी गद्यशैली, वर्तमान पत्रे, मासिके, शैक्षणिक पुस्तके यांच्या लेखनातून विकसित झाली. परंतु वाङ्:मयीन दृष्टीने अधिक महत्वाची अशी जी मराठी गद्याची ललितशैली, तिचा विकास मात्र प्रारंभीच्या काळात संस्कृतातील वा इंग्रजीतील कथांच्या व नाटकांच्या मराठीत झालेल्या भाषां-तरामुळेच. दुसरा जो मोठा लाभ झाला तो नाटयकलेच्या विकासाच्या दृष्टीने नाटकरचनेचीच एक नवी दृष्टी मराठी नाटककारास या भाषांतरात्मक नाटकामुळे प्राप्त झाली. अव्वल इंग्रजीमध्ये गद्यरचनेचे महत्व मान्य होऊन गद्याला योग्य ते स्थान मिळाले, एवढेच नव्हे तर पद्य रचनेपेक्षा गद्य रचनाच अधिक प्रमाणात झाली.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

भौतिकतेची ओढ:

मराठी गद्याला मिळालेले महत्व हा या कालखंडाचा आणखी एक विशेष मानावयास पाहिजे. प्राचीन वाङ्मयात पद्यरचना हेच वाङ्मयाचे बाह्यरूप अथवा शरीर होते. आध्यात्मिक व पारलौकिक ज्ञानाच्या जोडीने ऐहिक वा भौतिक ज्ञान आपणास व्हावयास पाहिजे. त्याचा शक्य तेवढा प्रसार व्हावयास हवा अशी भूक या काळामध्ये नवशिक्षितांच्या मनात निर्माण झाली होती, म्हणून "अनेक विद्यामूलतत्व संग्रह" करण्यात आला. "सिध्द पदार्थविज्ञान विषयक संवाद" लिहिले गेले. हिंदुस्थान, इंग्लंड यांच्या इतिहासाबरोबर जगाचाही इतिहास सांगण्याचा प्रयत्न झाला. या कालखंडात निघालेली वृत्तपत्रे आणि मासिके यांची नावे पाहिली तरी त्याची ज्ञान संपादनाची, त्यांच्या प्रसाराची दृष्टी स्पष्ट होईल. ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, ज्ञानचक्षू ही कांही वृत्तपत्रांची, तर चंद्रोदय, ज्ञानप्रसारक, ज्ञानदर्पण, विविध ज्ञानविस्तार आणि ज्ञानसंग्रह ही कांही मासिकांची नावे आहेत. या नियतकालिकांच्या नावांवरून त्यांच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट होते. वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्यात वृत्तपत्रांइतकेच मासिकांनाही महत्व आहे. मासिकांच्या द्वारा मुख्यत: धर्म, नीती, तत्त्वज्ञान, इतिहास, प्राचीन मराठी कविता इत्यादींचा ऊहापोह होऊ लागला.

इंग्रजी राजवटीबरोबर आणि त्या राजवटीमध्ये सुरू झालेल्या शिक्षणामुळे आपल्या ऐहिक आणि वर्तमानकालीन जीवनाविषयीच्या दृष्टिकोणामध्ये फरक होऊन त्याविषयी आपल्यास अधिक आस्था वाटू लागली. सामाजिक जीवनात किंवा धर्मविचारात कांही बदल, सुधारणा व क्रांती व्हावयास हवी. हा विचार नव्याने आलेला होता. इंग्रज आणि इंग्रजी यांच्याशी आपला जो संबंध आला त्यामुळे या विचाराला प्रारंभ झाला. धर्म आणि सामाजिक

जीवन याबाबतीत खूपच खळबळ माजून राहिली. बाळशास्त्री जांभेकर, महात्माप फुले, आगरकर यासारखे समाजसुधारक व विचारवंत वाड्.मयीन कार्य करीत होते. एकंदरीत श्रध्दा युगाचा लोप होऊन याकाळाची बुध्दि युगाकडे वाटचाल दिसून येते. इंग्रजी राजवटीमुळे निर्माण झालेल्या वक्तृत्वसभा, वाचनालये, चर्चामंडळे, छापखाने, वृत्तपत्रे इत्यादीचे आकर्षण निर्माण होऊन मध्यमवर्गीय समाजाला नव्या शिक्षणाची गरज व महत्ती पटलेली होती. इंग्रजी विद्येच्या अध्ययनाने येथील सुशिक्षितांना एक नवा बुध्दिवादी, ऐहिक गतिशील दृष्टीकोण प्राप्त झाला होता. त्या मिशनरी चळवळीमुळे भूतदया, समता, मानवसेवा, साधेपणा, कर्मठपणाचा तिटकारा इत्यादी प्रवृत्तींची भर पडली. आपल्याबरोबर मॅडमांना फिरायला घेऊन जाणारे इंग्रज अधिकारी पाहून आमच्याकडील सुशिक्षितांच्या मतांमध्ये स्त्रीस्वातंत्र्य व स्त्रीशिक्षणाविषयीचे विचार घोळू लागले. धार्मिक व सामाजिक क्षेत्रे अशी होती की ज्यावर इंग्रजी राजवटीचा जोरदार आघात झाला होता. या क्षेत्रांतील मूल्यांचा पुनर्विचार करण्याची निकड अव्वल इंग्रजी राजवटीतच निर्माण झाली. आपल्या सा-या दुरावस्थेची बीजे या दोन क्षेत्रांतील मागासलेपणात आहेत. असे अव्वल इंग्रजी काळातील विचार वंताचे मत बनले होते. इंग्रजांच्या सहवासामुळे एतद्देशीयांची जीवनदृष्टी बदलली. "स्व" विषयक जाणीव निर्माण झाली. पारलौकिकाकडून लौकिकतेकडे, अध्यात्माकडून भौतिकतेकडे, श्रध्दायुगाकडून बुध्दियुगाकडे पाहण्याची जीवनदृष्टी प्राप्त झाली. तसेच या कालखंडामध्ये जी वाड्:मयीन कामगिरी झाली. त्याच्या पाठीमागे त्या काळातील कांही संस्थाचाही प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षरित्या हातभार लागलेला होता. अशा प्रकारे वाड्:मयाचा हा रथ प्रगतीपथाकडे हळूहळू सरकत असल्याची जाणीव होते.

१) दक्षिणा प्राईज कमिटी:

अव्वल इंग्रजीमध्ये जी वाङ्‌मय निर्मिती झाली तीमागे काही संस्थांचा हातभार लागलेला दिसून येतो. त्यापैकी एक म्हणजे "दक्षिणा प्राईझ कमिटी" ही होय. दिलेला उत्तेजन म्हणून १८५८ नंतर वाङ्‌मय-निर्मितीच्या कार्याला प्रत्यक्षापणे सहाय्य करण्यासाठी निर्माण झालेली सरकारी संस्था म्हणजे "दक्षिणा प्राईज कमिटी". १८५१ मध्ये स्थापन झाली. पेशवाईतील निधी ग्रंथोत्तेजनाच्या कामी खर्च करण्याच्या उद्देशाने ही संस्था निघाली. या कमिटीचे प्रारंभीचे धोरण भाषांतरित ग्रंथांना उत्तेजन देण्याचे होते. प्रारंभीची यादी पाहिल्यास त्यामध्ये इतिहास, चरित्र, व्यवहारशास्त्र इ. विषयानाच प्राधान्य आहे. चिंतामणी पेठकर व बापूसाहेब कुरुंदवाडकर यांच्या "गंगावर्णना" पाठीमागे किंवा म.मो. कुंटे यांच्या "राजाशिवाजी" च्या लेखनामागे दक्षिणा प्राईज कमिटींच्या बक्षिसांच्या योजनेचीही प्रेरणा आहे.

२) बॉम्बे बुक आणि ट्राक्स सोसायटी:

ख्रिस्ती धर्मप्रसारक चळवळीचे एक प्रमुख अंग म्हणून देशी भाषांत पुस्तके प्रकाशित करण्यासाठी इ.स. १८२७ मध्ये बाम्बे बुक आणि ट्राक्ट सोसायटीची स्थापना झाली. तिच्या विद्यमाने पुढील पन्नास वर्षांत अनेक लहान मोठे ग्रंथ प्रसिध्द झाले.

मराठी गद्य: (सन १८२२-१८४०)

इ.स. १८४० मध्ये मुंबईची शिक्षामंडळी मोडून "बोर्ड ऑफ एज्युकेशन या नावाची एक सभा सरकारने स्थापन केली. बाम्बे नेटिव एज्युकेशन

सोसायटी स्थापन झालेल्या अठरा वर्षे होऊन गेली. इतक्या मुदतीत महाराष्ट्र भाषेत ग्रंथसंग्रह जेव्हा व्हावा तेव्हा जरी झाला नाही तरी गद्यात्मक लेखन पध्दतीत बरीच सुधारणा झाली. अनेक विषयांवर उपयुक्त ग्रंथही झाले.

३) उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा:

मराठी गद्य वाङ्‌मयाच्या विकासाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कारणीभूत झालेल्या तत्कालीन संस्थांपैकी ही एक होय. इ.स. १८४८ मध्ये "स्टूडण्टस्‌ लिटररी अँण्ड सायंटिफिक सोसायटी" या नावाची एक संस्था इंग्रजी शिक्षण घेतलेल्या कांही एतद्देशीय गृहस्थानी स्थापन केली होती. या सभेचे पहिले अध्यक्ष दादोबा पांडुरंग हे होते. मराठी भाषेतील पहिली स्वतंत्र कादंबरी "यमुना पर्यटन" या शिवाय इंग्रजी भाषेतील कांही कल्पित गोष्टींची भाषांतरे याकाळी प्रसिध्द झाली. त्यातील कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची "अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी" आणि "रासेलस" ही दोन भाषांतरे कादंबरी प्रमाणेच मराठी नाटय वाङ्‌मयाचा ही उगम याच काळात झाला. तसेच या काळातील निबंध वाङ्‌मय बव्हंशी नियतकालिकांतून प्रसिध्द झाले. गोविंद नारायण माडगांवकर भवानी रामकृष्ण कानविंदे, बाळ मंगेश वागळे, जनार्दन गाडगीळ, विनायक जनार्दन कीर्तने, म.मो. कुंटे इत्यादी लेखकांनी धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, औद्योगिक वगैरे निरनिराळ्या विषयांवर "मराठी ज्ञान प्रसारकां"त लहान लहान पण मुद्देसुद निबंध लिहिले. त्यांची रचना सामान्यत: इंग्रजी भाषेतील शालेय निबंधाच्या धर्तीवर आहे. जोतीबा फुले यांनी, "ब्राह्मणाचे कसब", "गुलामगिरी" ही दोन पुस्तके लिहून ब्राह्मणांच्या सामाजिक वर्चस्वावर जोराचा हल्ला चढविला.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

नव्या शिक्षणाचे परिणाम:

नव्या शिक्षणाचा परिणाम काय झाला याचा विचार करीत असता एक गोष्ट ध्यानात येते ती म्हणजे नव्या शिक्षणाने इंग्रजीसारख्या समृध्द भाषेशी आपली ओळख करुन दिली. आशय व अभिव्यक्ती यांचे कांही प्रकार नव्यानेच आपल्या समोर आणले गेले. अनेक ज्ञानशाखांशी परिचय करुन दिला. भाषेची उभारणी एका स्थिर पायावर केली. तिला एक नवे सांस्कृतिक मूल्य प्राप्त करुन दिले. सा-याच गोष्टींकडे बुध्दिनिष्ठ चिकित्सेने "ऐहिकचष्म्या"तून पाहण्याची दृष्टी आली. स्वभाषेच्या महत्तीबरोबर तिच्यातील वैगुण्यांचीही जाणीव करुन दिली गेली. ही वैगुण्ये दूर करण्यासाठी पध्दतशीरपणे व संघटितरित्या कसे प्रयत्न करता येतील याची दिशाही दाखविली. जातिनिरपेक्ष ऐहिक भूमिकेवरुन विचार करणारा एक नवा वाचकवर्ग व ज्ञान प्रसाराची नवी साधने उपलब्ध करुन दिली. ज्ञानाचे वितरण करणारे नवे ग्रंथकार पुढे आणले. तसेच काही नवीनच वाङ्मयप्रकारही मराठीमध्ये रुढ होऊ लागले.

१) वृत्तपत्रांचा उदय:

इंग्रजी राजवटीने अनेक गोष्टी आपल्याबरोबर नव्याने आणल्या. त्यापैकी वृत्तपत्र ही एक होय. मुद्रणकलेचा परिचय आपल्याला झाला आणि हळूहळू इंग्रजी भाषेतून वृत्तपत्र बंगालमध्ये १६०० साली "इंडियन गॅझेट" या नावाने निघाले. यातूनच वृत्तपत्र व्यवसायाची प्रेरणा भारतीयांना मिळाली. तत्कालीन वृत्तपत्र सृष्टीचे स्वरुप पाहिल्यास ती प्राधान्याने माहिती देणारी पत्रे व मतपत्रे असल्याचे दिसते. इंग्रजी पत्रातील उतारे, मद्रास, कलकत्याकडील बातम्या, सरकारी नेमणुका,

येणा-या जाणा-या बोटीची व उतारुंची माहिती इ. मजकूर येत असे. त्यामानाने देशी भाषांतील वृत्तपत्रे सोज्वळ दिसतात. त्याच्यापाठी-मागची प्रेरणाही समाजसेवा व देशाभिमान अशी होती. वृत्तपत्र हा व्यवसाय म्हणून चालविण्यापेक्षा ते वृत्त म्हणून चालविण्याचा बाणा बाळशास्त्री वगैरे मंडळीत होता. वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्यात वृत्तपत्राइतकेच मासिकांनाही महत्त्व आहे. गंभीर विषयाबरोबरच कथा, कादंबरी नाटय, काव्य इ. ललित वाङ्मयालाही मासिकांनीही उत्तेजन दिले.

सन १८६७ साली निघालेल्या "विविध ज्ञानविस्तार" मासिकाने तर ललितवाङ्मय, वैचारिक लेख, भाषाशास्त्र, व्याकरण, काव्य, ग्रंथ परीक्षणे इ. सर्वच प्रकारच्या वाङ्मयाला दीर्घकाळ उत्तेजन दिले. विशिष्ट वाङ्.-मयाभिरुची निर्माण करण्यात "विविध ज्ञानविस्तार" चा फार मोठा हात आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणाकर पूर्वकालीन वृत्तपत्रे व नियतकालिके यांच्या-शी संबंध असलेल्या जांभेकर, भाऊ महाजन, विष्णुशास्त्री पंडित, कृष्ण-शास्त्री चिपळूणाकर, लोकहितवादी, बाबा पद्मनजी, रा. भि. गुंजीकर या मंडळींनी धर्मांतर, स्त्री शिक्षण, विधवा विवाह, जातिभेद, लोकशाही, जनतेची दु:खे, त्यांचे हक्क, राज्यकर्त्यांचे अन्याय, अर्थकारण सांस्कृतिक घडामोडी इ. विविध व वैचित्र्यपूर्ण बाबींवर प्रांजळ मतप्रकटनांस सहाय्य केले. जनतेची चिकित्साबुध्दी व जिज्ञासा वाढवून तिला बहुश्रुत केले. तिच्यात वास्तव दृष्टी निर्माण केली. व्यक्तिमत्वाला पूर्वी महत्व नव्हते ते पध्दतशीरपणे इतरांना कळविण्याचे साधनही नव्हते. ते वृत्तपत्र व नियतकालिके यांनी उपलब्ध करुन दिले.

इंग्रज आपल्या देशात आले नसते तर आपल्याकडे नियतकालिके निघाली

नसती असे जरी म्हणता नाही आले तरी त्यांच्या आगमनाने ती लवकर निघाली. यात कांही शंका नाही. मुद्रणाची सोय हे नियतकालिक सुरु होण्याचे एक मोठे कारण होय. नियतकालिकांचे मूळ हे इंग्रजांच्या या देशांतील आगमनामध्ये आहे. व्यवहारोपयोगी ज्ञानाच्या बाबतीत आपण फारच मागासलेलो आहोत. अशी भावना आपल्याकडील विचारवंताच्या मनामध्ये दृढ झाल्यामुळे ज्ञान मिळविणे हा पुढील वर्षामध्ये आपल्या समाजाचा हव्यास होऊन राहिला. या काळात जी साप्ताहिके, मासिके निघाली त्यांच्यापुढे हेच एक ध्येय होते. म्हणून या कालखंडातील वृत्तपत्रीय वाङ्मयाचे महत्त्व साहित्यापेक्षा समाजदर्शनाच्या दृष्टीनेच अधिक आहे. त्यात वाङ्मयविचार फारच थोडा होता आणि वाङ्मयाभिरुची संपन्न करण्याच्यादृष्टीने त्यांचा तादृश्य उपयोग झाला नाही. ही दृष्टी अखेरीस "शालापत्रक" आणि "विविध ज्ञानविस्तार" यामधून व्यक्त होऊ लागली. व त्याचाच परिणाम म्हणून भाषा आणि वाङ्मय यांच्या अभिवृध्दिकरता "निबंधमाला" निघाली. तिची भूमिका तयार करण्याचे कार्य प्रस्तुत कालखंडातील नियतकालिक वाङ्मयाने केले. अशा प्रकारे नियतकालिकांच्या माध्यमांतून साहित्यनिर्मिती झाल्याचे दिसून येते.

ख्रिस्ती धर्म प्रसारकांनी आपल्या सेवाभावी वृत्तीने ख्रिस्ती धर्माची लाटच आणली होती. ती लाट थोपवून धरण्यासाठी जुनी शास्त्रवचने व साहित्य यांचे नव्याने मंथन झाल्याने प्राचीन वाङ्मयाच्या अभ्यासालाही याच कालखंडाने नव्याने चालना दिली. उदा. या धार्मिक आक्रमणाला तोंड देण्यासाठी व ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या विपर्यस्त टीकेचा हिंदुधर्मावर अनिष्ट परिणाम होऊ नये म्हणून मोरभट, दांडेकर, भाऊ महाजन, गंगाधर शास्त्री फडके, कृष्णाशास्त्री चिपळूणकर, इत्यादी विचारवंतानी त्या काळात प्रयत्न केला. यातूनच "चंद्रिका" (१८५४),"विचारलहरी(" "संदर्भ दीपिका (१८५५)

यासारखी कांही नियतकालिके जन्माला आली. तसेच प्राचीन मराठी काव्याच्या प्रकाशनामुळे हिंदुधर्माबद्दलची श्रध्दा टिकून राहिल या हेतूनेच की काय "ज्ञान चंद्रोदय" (१८४०) "सर्व संग्राह" (१८६९) यासारखी नियतकालिके सुरु झाली. त्याचप्रमाणे ख्रिस्ती धर्मोपदेशकाच्या प्रसारकार्याला पध्दतशीरपणे तोडीस तोड म्हणून सार्वजनिक व्याख्याने देऊन तोंड देण्याचा जबर प्रयत्न विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी केला. हिंदुधर्म पक्षपाती व "उपदेशचंद्रिका" मासिकाचे संपादक मोरभट दांडेकर यांच्या "हिंदुधर्मस्थापन" (१८३१) या ग्रंथावरुन कडाक्याचा वाद होऊन तो "हिंदुधर्माचे पहिले प्रसिध्दीकरण" (१९३२) या नावाने प्रसिध्द झाला. नव्या जुन्याचा परिचय, अनुकरण, दृढीकरण, समन्वय, संघर्ष इ. क्रियांना व तदनुषंगिक विचारांना याच काळात बहर आला. मुद्रणालये, वृत्तपत्रे इत्यादीच्या निर्मितीमुळे विचाराच्या प्रसारांची नवी साधने प्राप्त झाली. नव्या आकांक्षा जाग्या झाल्या. जुनी चौकट मोडली. युरोपमध्ये जे प्रबोधन झाले त्याची तोंड ओळख इंग्रजी राजवटीने भारतीयांना करुन दिली. जणू एका नवविचारचक्राचे प्रवर्तनच केले.

२) निबंध वाङ्मयाचा उदय:

या काळात-नवविचारांबरोबरच भाषा विकासही होत होता. त्या दृष्टीने नियतकालिके उपकारकच ठरली असे नाही तर त्यांनी मराठी वाङ्मयात निबंध या वाङ्मय प्रकाराचीही नवी भर घातली. एखाद्या विषयाचा सांगोपांग व बांधीव असा उहापोह करणारे लेखन बरेच विस्तृत असे. परंतु ग्रंथ होण्याइतका पसारा नसणारे लेखन या अर्थाने जो निबंध मराठीमध्ये रुढ झाला त्याचे मूळ नियतकालिक वाङ्मयामध्ये आहे. अव्वल इंग्रजीतील निबंधाचे कालपरत्वे दोन विभाग पडतात. १८३२ ते १८४९ हा पहिला विभाग.

पहिल्या विभागात श्रीमती फेरार व लोकहितवादी हे दोन प्रमुख निबंधकार. निबंध या वाङ्:मय प्रकाराची स्पष्ट जाणीव या कालखंडात उदयाला आली नव्हती. सुचेल त्या विषयावर सुचेल त्या शब्दात गद्य लिहिणे एवढेच या काळातील लेखकांची निबंधासंबंधीची कल्पना असावी.

या काळात राजकीय विषयांवर क्वचित लेखन झाले. मुख्य भर धार्मिक व सामाजिक विषयांवर दिला. १८४९ साली "ज्ञानप्रसारक" मासिक सुरु झाले व त्याच्याद्वारे अव्वल इंग्रजीतील दुसरा कालखंड सुरु झाला. शास्त्राधार देणे या अर्थाने निबंध ही संज्ञा जुनी असली तरी निबंध हा वाङ्.मय प्रकार मात्र आधुनिक आंग्ल वाङ्:मयाच्या अभ्यासाने अव्वल इंग्रजीत हळूहळू विकसित झाला. जुन्या खाजगी शिक्षण पध्दतीचा क्स उत्तर पेशवाईतच नाहीसा झाला होता व नवी शिक्षण प्रणाली पूर्णांशाने अस्तित्वात आली नव्हती. समाज चकित व मूढ झाला होता. प्रत्येक नव्या जुन्या घटनेची समज अगदी नव्यानेच देणे भाग होते. अशा समाजासाठी अव्वल इंग्रजीत जे गद्य अवतरले त्यातून मराठी निबंध उत्क्रांत झाला. अव्वल इंग्रजीतील निबंध-सदृश्य गद्याला असे बालबोध वळण लागण्याचे आणखी एक कारण मराठी काव्याप्रमाणेच मराठी गद्याला उज्ज्वल व अखंड वाङ्:मयीन परंपरा नव्हती. १८५७ पासून नियतकालिकांत मराठी निबंध स्वतंत्ररुपाने वावरु लागला. मराठी "ज्ञानप्रसार"चे या बाबतचे कार्य ऐतिहासिक महत्वाचे आहे. भाषा व विचार या सर्व दृष्टींनी शुध्द व सक्स मराठी निबंध अवतरले. मुख्य म्हणजे निबंध एक स्वतंत्र वाङ्:मयप्रकार आहे. दादोबा, मराठे, कृष्णशास्त्रींनी थोडयाफार प्रमाणात निबंध लेखन केले. यामुळे अशी "वाङ्:मयीन जाण" अव्वल इंग्रजीत नव्हतीच. मात्र अव्वल इंग्रजीतील निबंधकारानी मौलिक विचार, आक्रमक वृत्ती, सुसूत्र निरुपण, शैलीचे कसब ही सारी वैशिष्टये विभक्त

रीतीने आपापल्या निबंधातून आणून नव्या युगाची तयारी केली होती. यातील अधिकांश वैशिष्टये पचवून व नवी वाङ्:मयीन जाण बाळगून निबंध लेखन करणारा "मालाकार" पुढे प्रकटला. स्वकालीन समजाला उपदेश करण्याचे जागरूक कार्य करीत असतानाच या भावी निबंधकाराची पायवाट ही अव्वल इंग्रजीतील, निबंधकारांनी तयार करून ठेवली.

प्रारंभीची ग्रंथनिर्मिती:

इंग्रजी राजवटीचे आगमन आमच्या देशातील ललित वाङ्.मयाना बहर आणणारे होते. तर कांही वाङ्:मय प्रकार हे मराठीमध्ये नव्यानेच सुरु होत होते. या कालखंडामध्ये ब्रिटीशांनी एतद्देशीयांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची दक्षता घेतलेली होती हे आपणांस प्रारंभीच्या ग्रंथनिर्मितीवरून दिसून येते. नैतिक बोधाचा पुरस्कार करणाऱ्या व त्यांच्या प्राथमिक स्वरूपाचा परिचय करून देणाऱ्या ग्रंथावर विशेष भर दिलेला दिसतो. त्याचबरोबर मनोरंजन करणारे व विज्ञानाच्या प्राथमिक स्वरूपाची माहिती करून देणाऱ्या ग्रंथावर भर देण्याचे धोरण राज्यकर्त्यांनी अवलंबिलेले दिसते. सुभाषिते, नीतीकथा, पशुपक्ष्यांच्या कथा लिहून घेण्याच्या भूमिकेतूनच पंचतंत्र, बाळमित्र, हितोपदेश, पंचोपाख्यान, विदुरनीती, वेताळपंचविशी, सिंहासन बत्तिशी इ. ग्रंथ निर्माण झाले. वाचकाला व्यवहारनीती कळावी, भाषेचे ज्ञान व्हावे हे उद्देश या ग्रंथलेखनाच्या मागे होते. अशा प्रकारच्या लेखनात अग्रगण्य ठरलेले अव्वल पिढीतील लेखक म्हणजे बापू छत्रे व हरि केशवजी हे होत. सरकारचे शैक्षणिक धोरण सांभाळून मराठीत इंग्रजी गद्याचा सुबोध अनुवाद करणारे लेखक हा त्या काळचा आदर्श शैलीकार होता. आणि हा मान सदाशिव काशिनाथ उर्फ बापू छत्रे यांच्याकडे जातो. या कारणासाठी त्यांना अर्वाचीन मराठी शैलीचे जनक मानण्यात येते.

त्यांच्या "बाळमित्र" या पुस्तकाचा त्याकाळी पुष्कळ बोलबाला झाला होता. यावरून तत्कालीन ललित वाङ्मयाचे प्रयोजन स्पष्ट होईल.

पद्याचा उपयोग:
===========

आपल्याकडील काव्याची परंपरा जुनी आहे. प्राचीन काळातील रामायण, महाभारतासारखी महाकाव्येदेखील पद्यमय आहेत. ब्रिटिश आमदानीत देखील गद्याच्या मानाने पद्याची निर्मिती अधिक व्हावी हे स्वाभाविक होते. कुंटे यांनी तत्कालीन वाचकांचे अभिरुची दृष्टया तीन वर्ग पाडले आहेत.

१) संस्कृत काव्याभिमानी शास्त्रीय मंडळी,

२) नव्या अभिरुचीचा इंग्रजी जाणणारा वर्ग,

३) अशिक्षित जनता.

संस्कृत पध्दतीच्या कृत्रीम लेखन पध्दतीवर हल्ला चढवून स्वाभाविक व अकृत्रिम शैलीचा पुरस्कार आपल्या "राजा शिवाजी" या काव्यात म.मो. कुंटे यांनी केला आहे.

जुन्या परंपरा:
==========

भक्ति परंपरेपेक्षा तत्कालीन पिढीला जवळ असलेली परंपरा शाहिरांची होय. प्रभाकर आणि परशुराम हे पेशवेकालीन दोन नामवंत शाहीर. संतांच्या व शाहिरांच्या परंपरेला अव्वल इंग्रजीत प्राप्त झालेले हे स्वरूप पाहिल्यानंतर उरलेली जुनी परंपरा डोळ्यासमोर येते ती पंडितांची. संस्कृतच्या अध्ययनाने व पढीक रसिकतेमुळे हीच परंपरा इतर दोन परंपरेपेक्षा तत्कालीन प्रतिष्ठित लेखकात अधिक मान्यता पावली.

काव्य:
====

आपल्याकडील मराठी काव्याची परंपरा सामान्यत: संत, पंत, तंत अशाक्रमाने पहावयास मिळते. प्राचीन कवितेत संतांच्या साहित्यापासून ते शाहिरांच्या साहित्यापर्यंत प्रतिपाद्य विषय ठरलेले असत. अर्वाचीन कवितेची प्रकृती देशी असली तरी तिच्यावर इंग्रजी संस्कृतीची जबददस्त छाप पडलेली दिसून येते. जुन्या मराठी राजवटीच्या लयीबरोबर शाहिरी परंपरा ही लुप्त प्राय झाली. परंतु जुने शाहिरी कवितेचे प्रकार हे इंग्रजी साहित्याच्या संपर्काने आधुनिक मराठी कवितेत रूढ झालेल्या प्रेमगीतांना व राष्ट्रीय कवनांना त्याच रसाचे पाठबळ असल्यामुळे या नव्या काव्य प्रकारामध्ये पूर्णतया एकरूप झाले. "निर्वेद" या अंत:प्रेरणेवर अधिष्ठित असलेली अंर्तमुख भक्तिपरंपरापुढे नव्या इंग्रजी राज्यात अखंडित राहिली. इंग्रजी राजवटीचा प्रभाव हा राजकारणापुरताच मर्यादित न राहता तो थोडयाच अवधीत धर्म, समाज, व्यापार, व्यवहार यांच्यापर्यंत पसरला. त्याचा परिणाम असा झाला की नव्याने निर्माण झालेली बौध्दिक जागृती जुन्या भोळया-भाबडया भाविकतेला "अंधश्रध्दा- हे नांव देऊन तुच्छ लेखू लागली. यामुळे साहजिकच भक्ति परंपरेचा जुना जोम कायम राहिला नाही.

जुने बहुतेक सर्व साहित्य पद्य बंधात्मक आहे. मुंबई विद्यापीठाची स्थापना होऊन त्यात संस्कृत भाषा व अध्यापनास आरंभ झाल्यावर मूळ संस्कृत ललित वाड्:मयासमोर त्याची ही मराठी भाषांतरे अगदीच नीरस व बेढब वाटू लागली. विद्यापीठात संस्कृत साहित्याच्या बरोबरीने किंबहुना त्याहून ही अधिक प्रमाणात इंग्रजी भाषा यांच्या परिशीलनास प्राप्त झाली. होती. कारण ती राज्यकर्त्यांची व राज्यकारभाराची भाषा होती. वाड्:मय विशेष अलंकृत नसताना ही आपल्या सहजतेने अंत:करणास वेध लावते. हे सत्य नव-

शिक्षितांच्या लक्षात आले होते. तेव्हां त्यांना अशा प्रकारचे साहित्य आपल्याकडे असावे असे साहजिकच वाटून ते इंग्रजी काव्याचे व नाटकाचे अनुकरण करू लागले. हे भाषांतरीत साहित्य हळूहळू त्याकाळच्या नियतकालिकांत प्रसार पावू लागले. मनू बदलतो, माणूस बदलतो आणि त्याबरोबर त्यांचे साहित्य ही बदलते. इंग्रजी राज्या आल्यामुळे येथील परिस्थिती सामाजिक आचार-विचार, विद्या व कलाकौशल्ये आणि उद्योगधंदे या सर्वात बदल होत होता. पाश्चात्यांच्या धर्माची, तत्वज्ञानाची आणि शास्त्राची नित्य नवीन माहिती होत होती. स्वदेश, स्वभाषा, स्वबांधव, स्वजनहित अशा व्यापक ध्येयाकडे दृष्टी वळल्यामुळे येथील जनतेची जुनी पुराणी निवृत्तिपर वृत्ती दिवसेंदिवस प्रवृत्तिपर बनत होती.

तसेच इंग्रजीतील कांही नवे काव्य प्रकार मराठीमध्ये रूढ होऊ लागले होते. Epic, Narrative Poem, Satire Lyric, Elegy इत्यादी भिन्न भिन्न कविता प्रकार मराठीत बध्दमूल करण्याचे प्रयत्न झाले. नवशिक्षितांनी words from poets, A Thousand and One Gems of Poetry Golden Treasury, इत्यादी इंग्रजी कविता संग्रहातील कवितांना मराठी साज चढविण्याचे कार्य चालविले. नवे नवे विषय कवितांमधून येऊ लागले. पूर्वी आध्यात्म, वेदांत, पुराणकथा, संसारत्याग हेच काय ते मर्यादित काव्यविषयक होते. परंतु आता सृष्टी , राष्ट्र, समाज आणि दैनंदिन जीवन यांच्याकडे पाहण्याची दृष्टी प्रवृत्तिपर झाली. नवीन कवितांच्या भाषामध्येही बदल झाला. ती गद्याच्या ब-याच जवळ आली. सन १८६७ मध्ये बजाबा रामचंद्र प्रधान यांनी सर वॉल्टर स्कॉटच्या "द लेडी ऑफ लेक"च्या आधारे "दैवसेनी" हे इंग्रजी त-हेचे पहिले मराठी खंडकाव्य रचून प्रसिध्द केले. इंग्रजी पध्दतीची वीररस पूर्ण कविता "राजा शिवाजी" इंग्रजी

वळणाची सृष्टीवर्णनात्मक कविता "गंगावर्णना" इ. मराठी काव्यामध्ये येऊ लागल्या. आधुनिक कवितेतील इंग्रजी पध्दतीच्या प्रणयाचे दर्शन महाजनींनी घडविले. याची साक्ष म्हणजे "भिल्लकन्या" होय.

"सन १८८५ मध्ये इंग्रजी काव्याची परंपरा केशवसुतांनी स्विकारली होती. त्या परंपरेत खरे पाहता व्यक्तिस्वातंत्र्यावरच भर होता. तसेच केशवसुतांनी सॉनेट हा काव्यप्रकार मराठीमध्ये रूढ केला. तसेच प्रेमकविता, भावकविता मराठीमध्ये रूढ केलेल्या दिसतात. केशवसुतांच्यावर शेली, बायरन, कीटस्, वर्डस्वर्थ, गोल्डस्मिथ या कविंचा प्रभाव होता. अशा प्रकारे इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासामुळे मराठी काव्यामध्ये खंडकाव्य, वीररसपूर्ण कविता, सृष्टीवर्णन, विलाप लहरी, प्रणयदर्शन, सुनीत, भावगीत इ. नवे काव्य प्रकार मराठीमध्ये रूढ झाले होते.

कादंबरी:
======

काव्यावर जशी जुन्याची छाप दिसून येते त्याचप्रमाणे इंग्रजी राजवटीत निर्माण झालेल्या कादंबरीसारख्या नव्या ललित लेखन प्रकारावर ही संस्कृत शैलीची घनदाट छाया आहे. कथा कादंबऱ्यांच्या स्वरूपाकडे नजर टाकल्यास त्यात आपल्याला दोन तीन वळणे स्पष्ट दिसतात. त्यातील एक म्हणजे प्राचीन वाङ्मयातील गद्यरचनेशी सांधेजोड साधण्याचा प्रयत्न करणारे "बखरी" चे वळण म्हणावे लागेल. तसेच या काळातील दुसरे महत्वाचे वळण म्हणजे "मिशनरी वळण" उल्लेखिता येईल. सक्खन पंडित किंवा वैजनाथशास्त्री ही शास्त्रीमंडळी कथा वाङ्मयाची आद्यनिर्मिती असून त्यांच्या रचनेत इसापनीती किंवा पंचतंत्र हितोपदेश यासारखी एतद्देशीय वा तत्सम परंपरेची ग्रंथ सामग्रीच प्रथमत: आली असली तरी त्यातून निर्माण झालेल्या वळणाला "मिशनरी वळण" असे नाव रास्त वाटते. कारण केवळ नीतिवादी किंवा

उपदेशपर कथा रचना असो, की खुद्द मिशनरी आणि त्यांच्या गोटातील मंडळी यांनी उघड तारणाच्या उद्दिष्टाने केलेली धार्मिक नीतिपर रचना असो त्या रचनेत मांडणीचा एक समान धागा आढळत जातो. मिसेस् फरार, बाबा पद्मनजी, मिसेस मुलेन्स यांच्यासारखी प्रत्यक्ष ख्रिस्ती प्रसाररक मंडळी, हरि केशवजी, बापू छत्रे, वि.कों. ओक, गोविंद शंकर बापट यांच्या सारखी ख्रिस्ती नसलेली, पण नीत्युपदेशपर रचना करणारी विद्याखात्याशी निगडीत असलेली मंडळी आणि स्वतंत्रपणे बोधपर रचना करु इच्छिणारी मंडळी या सर्व व्यक्तिंचा लौकिकात कांही संबंध असो वा नसो परंतु रचनेमधील साम्य दिसून येते. तर या वळणामुळे मराठी कथा कादंबरी अद्भुतरम्य दुनियेतून वास्तव परिचित भूमीवर वावरु लागली. आणि तिसरे वळण म्हणजे या कालखंडातील कथा कादंब-यांचे प्रातिनिधिक म्हणून ओळखले जाणारे "मुक्तामाले"चे किंवा अद्भुतरम्य वळण होय. अद्भुतरम्य वळण अनेक घटकांनी बनलेले आहे. त्यातील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे संस्कृत काव्यनाटकांचा होय.

मिशनरी वळणामध्ये कथा कादंबरी वाङ्‌मय जे तयार होत होते त्याच्या मागची प्रेरणा ही "बाम्बे बुक अँण्ड ट्रॅक्ट सोसायटी" व तत्सम मिशनरी संस्था इ.ची होती. त्याचप्रमाणे वि.कों.ओक यांनी बुक अँण्ड ट्रॅक्टसाठी रचना केल्याचे ही नमुद केले आहे. यासाठी निवडलेले विषय ही आर्थिक उपदेशपर आणि पांडित्यपूर्ण असत.

परंतु इंग्रजीतील "नाव्हेल" या प्रकारचे मराठीत नामकरण होताना एकोणिसाव्या शतकात त्याचा उल्लेख "नाव्ल" असाच केला गेला आहे.पण जे नाव लोकप्रिय झालेक्ते कादंबरी हेच होय. "शुकबहातरी", "सिंहासन बत्तिशी" इ. सारख्या कथांचा परिणाम ही या काळच्या कादंबरी, वाङ्.-

मयावर झाल्याने त्यात अद्भुततेबरोबर उत्तान शृंगाराच्याही छटा उतरल्या आहेत. या कादंब-या प्राधान्याने प्राथमिक अवस्थेतील अभिरुचीच्या वर्गा-साठी लिहिलेल्या असल्याने त्याचे स्वरुप अतिशयोक्त स्वप्न रंजनात्मक व शृंगारप्रचूर असेच राहिले. मुक्तामाला, मंजुघोषा, रत्नप्रभा, वसंतमाला, चंपकमाला इ. कादंब-यांची नांवे पाहिली तरी त्यातील वातावरणाची कल्पना येते. संभाव्यता, वास्तवता, व्यक्तिदर्शन इ. घटक त्यात अद्यापि अवतीर्ण व्हावयाचे होते. या कादंबरी लेखनाला विटूनच तत्कालीन पिढी-तील एक विचारवंत का.बा. मराठे यांनी या प्रकारच्या कादंबरी लेखनाला "कीड" असे संबोधले आहे. जेवढे पुरुष तेवढे मदनाचे पुतळे, स्त्रिया तेवढया तिलोत्तमा. प्रत्येक शोकस्थळी मरणासारखा शोक व आनंदस्थळी स्वर्गा-सारखा आनंद असे तत्कालीन कादंब-यांचे उपहासपर वर्णन मराठे यांनी केले आहे. परंतु इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासामुळे आपल्याकडील कादंबरी लेखनामध्ये नवीन विषय, सामाजिक समस्या, वास्तवता इ. गुण उतरु लागले. सामान्य माणूस ही कादंबरीचा नायक होऊ शकतो. ही कल्पना रुढ होऊ लागली. मराठी कादंबरीच्या हरिभाऊ पूर्व वैशिष्टयांचा विचार करताना कथानकाचा शोकान्त करण्याचा उपक्रम ही सुरु झाल्याचे रहाळकरांच्या, "नारायणराव व गोदावरी" (१८८४) या कादंबरीवरुन दिसते.

अव्वल इंग्रजीतील कथाकादंब-यांचे प्रमुख वळण "अद्भुत रम्य" असले तरी त्या त्या वळणाच्या निदर्शक "मुक्तामाला" या कादंबरीच्या आधीच वेगळ्या वळणाची "यमुना पर्यटन" ही कादंबरी बाबा पद्मनजीनी १८५७ मध्ये प्रसिध्द केली. विधवा विवाहाच्या प्रश्नाला तोंड लागले असताना विधवा दु:स्थितीच्या हकीकतीतून एक सुसंगत कथा सांगण्याचा प्रयत्न बाबा पद्मनजीनी हेतुपूर्वक केला. अशिक्षित आणि पददलित असलेल्या स्त्रियांची हकिकत सांगताना भाषा शक्य तेवढी सोपी ठेवली आहे. "यमुना पर्यटन"चा एक

विशेष डोळयात भरतो तो म्हणजे कथानकाचा साध्या सरळ स्वभात अविष्कृत झालेला वास्तववाद मिसेस फरार यांच्या कथा ग्रंथातील भाषा व विचार उघड उघड ख्रिस्ती कळणाचे आणि हिंदुधर्मावर व चालीरीतीवर टीका करणारे असले तरी कथन पुष्कळसे सहज आहे. ख्रिस्ती प्रचारात केवळ धार्मिक परिवर्तनावर भर नसून सामाजिक चालिरीती व आर्थिक सुधारणा यांकडे मिशन यांचे लक्ष किती होते. याची निदर्शक म्हणजे त्याची कथा, तसेच वि.बा. दामले यांची "अवलिया" (१५८९) ही कादंबरी अव्वल इंग्रजीतील एक चांगल्या पैकी सामाजिक कादंबरी म्हणून उल्लेखिता येईल. तसेच कादंबरीच्या पहिल्या पिढीत स्वभाव लेखन आणि मनोविश्लेषण यांना इतके महत्व देणारी ही बहुधा एकुलती एक कादंबरी म्हटले तरी चालेल.

नाटक (प्रेरणा):
====

संस्कृतातील किंवा इंग्रजीतील ग्रंथांची भाषांतरे मराठी भाषेत करण्याची इच्छा त्यावेळच्या लेखकांना झाली याचे मोठे कारण म्हणजे या काळात इंग्रजाच्या आगमनामुळे इंग्रजी विद्या व कला यांचा परिचय एतद्देशीयांना झाला होता. विद्याप्रेमी इंग्रजांच्या प्रोत्साहनामुळे व पुरस्कारामुळे एक नवे प्रबोधन यावेळी महाराष्ट्रात घडून आले. याचवेळी आपल्या संस्कृतीचा संपन्न ठेवा असलेल्या अभिजात संस्कृत नाटयवाङ्मयाकडे अनेक शास्त्री मंडळीचे लक्ष वेधले गेले. नाटकाचे पहिले वहिले छापील पुस्तक म्हणून "प्रबोध चंद्रोदय" या भाषांतरित नाटकास बहुमान मिळाला. याच सुमारास भास्कर दामोदर पाळंदे यांनी कालिदासाच्या "विक्रमोर्वशीय" नाटकाचा अनुवाद केला. या भाषांतर मालिकेत परशुरामपंत गोडबोले व कृष्णशास्त्री राजवाडे या

दोघांनी महत्वपूर्ण कामगिरी केलेली आहे.

साधारणपणे १८५७ ते १८७२ या कालखंडामध्ये संस्कृत नाटकाचे मराठी लोकांना फार आकर्षण होते. या कालातच फार मोठया प्रमाणावर भाषांतरे झाली. अशाप्रकारे संस्कृत नाटकांची जी कांही मराठी भाषांतरे झाली त्यामागे आपल्या प्राचीन परंपरेचा अभिमान आणि संस्कृत नाटकातील आशयाच्या मुळ रूपाला धक्का न लावता मराठीत आणण्याचा प्रयत्न भाषांतर कर्त्यांचा असला तरी ती रंगभूमीच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेली नाहीत.

इंग्रजी नाटकांची भाषांतरे या कालखंडामध्ये दोन वेगवेगळे प्रवाह वाहतांना दिसतात. त्यापैकी एक म्हणजे जुन्या परंपरेतील शास्त्री मंडळींना संस्कृत नाटयाविषयी अभिमान होता आणि दुसरा प्रवाह म्हणजे इंग्रजी शिक्षण घेतलेल्या नव्या पिढीस इंग्रजी नाटकांचे आकर्षण होते. संस्कृतमधून अनेक महान नाटककारांच्या अभिजात नाटकांची भाषांतरे करण्यात आली. परंतु इंग्रजीच्या बाबतीत शेक्सपियरपुरताच हा झपाटलेपणा सिमित दिसतो. अशा प्रकारे मराठी रंगभूमी संस्कृत व इंग्रजी नाटकांच्या भाषांतर रूपांतराने विकास पावली.

बुकीश नाटके:

पुस्तकरूपाने प्रकाशीत होऊन रंगभूमीवर ज्याचे प्रयोग होण्यास सुरूवात झाली अशा नाटकास "बुकिश नाटके" अशी एक संज्ञा त्या काळात प्राप्त झाली होती. "थोरले माधवराव पेशावे" हे मराठी वाङ्‌मयातील पुस्तक-रूपाने प्रसिध्द झालेले पहिले स्वतंत्र नाटक असलेमुळे तेच पहिले बुकिश नाटक होय.

या कालखंडात पौराणिक, ऐतिहासिक या कल्पित स्वरूपाची नाटके ज्या विपुल प्रमाणात लिहिली गेली. त्या प्रमाणात सामाजिक नाटके या

लिहिली गेली नाहीत. अवघी दोन-चार नाटके या तीस पस्तीस वर्षात लिहिली गेली. गोविंद नारायण मांडगावकर यांचे "व्यवहारोपयोगी नाटक" प्रथम "ज्ञानप्रसारक" मासिकात १८५७ मध्ये प्रसिध्द झाले.

फार्स:
===

इंग्रजी विद्या व कला यांचे प्रभावामुळे मराठी नाटक सृष्टीमध्ये "फार्स" अवतीर्ण झाला. मात्र फार्स किंवा प्रहसन यांचा आज जो केवळ विनोदी स्वरूपाचे नाटय असा आहे. तसा त्या काळात केला जात नव्हता. कांही ऐतिहासिक स्वरूपाच्या गंभीरच नव्हे तर शोकात्मक नाटकांना सुध्दा "फार्स" म्हणण्याची प्रथा होती. हे "नारायणराव पेशव्यांच्या वधाचा फार्स" इ. त्या काळच्या नाटकांच्या नावावरूनच लक्षात येईल. मुख्य नाटक जर गंभीर असेल तर तो खेळ संपल्यानंतर एखादे लहानसे हास्यकारक प्रहसन करून दाखविण्याची प्रथा तेव्हा इंग्लंडमध्ये होती. इंग्रज प्रेक्षकांप्रमाणेच मराठी प्रेक्षकांना ही फार्सचे आकर्षण होते. या नाटकांनी मराठी सामाजिक नाटकांची पूर्व-तयारी केली.

ट्रॅजेडी:
====

कोणत्याही कॉमेडीपेक्षा ट्रॅजेडी परिणामकारक ठरते. "थोरले माधवराव पेशवे" हे मराठी रंगभूमीवर आलेले पहिले पुस्तकी नाटक, हे नाटक दु:खपर्या-वसायी असल्यामुळे थोरल्या चिपळूणकरांनी त्यास ट्रॅजेडी म्हणून संबोधले. या नाटकाध्दारे प्रथमच वास्तवाला प्राधान्य मिळू लागले. हा या काळातील नाटय-लेखनाच्या दृष्टीने लक्षणीय असा बदल मानावा लागेल.

संस्कृत नाटकांची परंपरा पाठीशी असली तरी पाश्चात्य नाटककारांच्या परिचयामुळे, प्रभावामुळे, सहवासामुळे वास्तवाभिमुख, लौकिकाधिष्ठित, व्यक्ति-प्रसंगांना प्राधान्य असणारी कलाकृती म्हणजेच शोकात्मिक लिहिल्या गेल्या.

इतर वाङ्.मय:

मुंबईचे वर्णन व पुणे शहराचे वर्णन हे दोन स्थळ वर्णनात्मक ग्रंथ "प्रसिध्द स्थळे" इंग्लंडातील प्रवास, गोकर्ण महाबळेश्वराच्या यात्रेचा वृतान्त आणि काशी यात्रा ही प्रवासवर्णनपर पुस्तके, मोरोपंताच्या केकावलीवर दादोबांची "यशोदा-पांडुरंगी" आणि परशुरामांनी त्यांनी "केकादर्श" हे दोन टीका ग्रंथ प्रसिध्द केले.

समारोप:

वाङ्:मयदृष्टया या काळातील एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुंबई विद्यापीठाची स्थापना (१८५७) ही होय. या सा-या धुमचक्रीत साहित्याच्या सौंदर्यात्मक अंगाकडे लक्ष जाणे कठीण होते. उपयुक्ततेच्या महत्तीमुळे ललित वाङ्.मयाचा वापर ही बोध व प्रचार यासाठी मुख्यत: करण्यात येऊ लागला. मनोरंजनाबरोबरच भाषेचा परिचय घडविणे व वाचनाची अभिरुची निर्माण करणे हे ही ललित वाङ्.मयाचे प्रयोजन होऊ लागले. काही नवे वाङ्.मय प्रकार ही मराठीमध्ये रूढ झाले. मध्ययुगीन स्थितीत असलेल्या या खंडप्राय वैचित्र्य देशाला नव्या विचारमूल्यांची ओळख करून देऊन आधुनिक विज्ञान युगाच्या कक्षेत आणणे ही ब्रिटिश राजवटीची प्रमुख कामिगिरी. किंबहुना सा-याच आधुनिक मराठी वाङ्:मयाचे उगमस्थान याच कालखंडात आहे.

......

काव्यनिर्मिती:

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये एकोणिसाव्या शतकातील काव्य विचारांचा पार्श्वभूमी दाखल परामर्ष घ्यावयाचा आहे. म्हणून तत्कालीन काव्य निर्मि-

तीच्या स्वरूपाचा जाणिवपूर्वक विचार या प्रकरणाच्या अखेरीस आवश्यक तेवढ्या तपशीलाने केला आहे.

वास्तविक १८०० ते १८७४ हा कालखंड म्हणजे नव्या जुन्याचा संधिकालच म्हटला पाहिजे. जुन्या कवितेचे प्रवाह जसे या काळात वाहात होते, तसे नव्या कविता लेखनाची पूर्व तयारी ही सुरु झाली होती. या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्यापैकी म.मो. कुंटे हे एक होत. त्यांनी इंग्रजीतील वीररस प्रधान काव्य मराठीत नवीनच निर्माण केले. या काव्याला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना ही मराठीतील काव्य विषयक नव्या जाणिवेचे प्रसाद चिन्हच होय. पंडिती वळणाची कविता वृत्तमात्रात जखडलेली आणि संस्कृत प्रचूर असल्याने सर्वसामान्यांपर्यंत पोहचत नव्हती. काव्य हे लोकसमुदायाच्या उत्कर्षासाठी आहे. असे मानून काव्याची भाषा सर्वांना समजेल अशी असावी असा विचार मांडणारे कुंटे हे पहिले कवी होत. मराठी कवितेबद्दलचे बदलत्या जाणिवांची साक्ष म्हणून "राजा शिवाजी" ची प्रस्तावना महत्वपूर्ण ठरते.

आधुनिक कवितेच्या प्रारंभाचा विचार करताना परशुराम तात्या गोडबोले यांचे नाव प्रथम पुढे येते. इंग्रजी राजवटीत मराठी वाङ्मयाचा पाया घालताना व्याकरण, कोश, छंदशास्त्र, पाठ्यपुस्तके इ. उपकरणांच्या निर्मितीचे जे जे सरकारी प्रयत्न झाले. त्या त्या सर्वांना तात्यांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हातभार लागला होता. त्यांनी ज्या अभिजात संस्कृत नाटकांची भाषांतरे केली आहेत ती इ.स. १८५७ मध्ये. तसेच मुंबई विद्यापीठाची कायद्याने स्थापना होईपर्यंत व त्यानंतर ही कांही काळ त्यात मराठीला दुय्यम भाषा म्हणून स्थान होते. शिवाय इ.स. १८५४ मध्ये तात्यांनी प्राचीन मराठी कवींच्या काव्यांचे मंथन करुन महाराष्ट्राच्या रसिक जनांना "मधुर काव्यामृताचा" आस्वाद चाखविला. "नवनीत" काढण्याच्या

त्यांच्या या बहुमोल व उपयुक्त नीतीमुळे प्राचीन व अर्वाचीन मराठी कवितेचा सांधा बेमालूमपणे सांधला गेला. तेव्हा अशा रितीने ज्या ज्या कर्तृत्ववान पुरुषाने जुन्या व नव्या वाङ्.मयांची परंपरा अखंडित ठेवली त्याचा इ.स. १७९९-१८७४ हा काळ मराठी वाङ्.मयाचा प्रारंभकाळ म्हणून मानण्यास हरकत नाही. सारांश इंग्रजी राजवटीच्या आरंभाबरोबरच कवितेचाही प्रारंभ झाला. असे स्थूलमानाने म्हणाता येईल.

जुन्या परंपरेचे नवे रुप:
================

या प्रमाणे जुनी शाहिरी परंपरा नव्या युगाच्या प्रवाहात नाहिशी झाली. परंतु जुनी भक्ति परंपरा मात्र आपले शुध्द अधिष्ठान ढळू न देता तशीच टिकून राहिली. इंग्रजी साहित्याच्या संपर्काने आधुनिक मराठी कवितेत अधिष्ठीत झालेल्या प्रेमगीतांना व राष्ट्रीय कवनांना त्याच रसाची पाठबळे असल्यामुळे ते जुने शाहिरी कवितेचे प्रकार या नव्या प्रकारात पूर्णतया एकरुप झाले. भक्तिरसाची गोष्ट वेगळी आहे. त्याच्या मुळाशी "निर्वेद" हा स्थायीभाव नसून ती एक मूलभूत अंत:प्रेरणा आहे. या वेदान्त विषयक ग्रंथा-पेक्षा त्या काळी ती भक्तियुक्त पदे जन्मास आली. ती आज घटकेस पदे जन्मास आली. ती आज घटकेसही समाजात प्रिय आहेत. या सुश्लिष्ट व उत्कृष्ट भक्तिगीतांच्या निर्मात्यान क-हाडचे विठोबा आण्णा दप्तरकर हे अग्रेसर होते. आण्णांची कविता तोलात कमी ठरेल. पण मोलात अधिक ठरेल. आण्णांच्या पदांप्रमाणे एकेकाळी भास्कर दामोदर पाळंदे यांच्या "रत्नमाले"तील स्तोत्र महाराष्ट्रात प्रसिध्द होती. मराठी भाषेचे पाणिनी दादोबा पांडुरंग तर्खडकर हे सुध्दा परमार्थपर कविता करीत. इंग्रजीतील "परमहंस" सभेचे ते एक संस्थापक होते. या सभेसाठी त्यांनी अभंगाच्या स्वरुपाची कांही फुटकळ कविता केली होती. परंपरेची भक्ति आणि

आणि नाविन्याची प्रीती या दोन सनातन प्रवृत्ती आहेत. जीवनात या दोन्हींचा संघर्ष सतत सुरु असतो आणि त्यामुळेच नव्या परंपरा वा संप्रदाय जन्म पावत असतात. अर्थात उगमाजवळ ते केवळ प्रवाह असतात. कालांतराने त्याचे संप्रदायात आणि समाज संपर्काने दीर्घकालाने परंपरागत रुपांतर होते. १८८५ च्या सुमारास मराठी कविता जन्माला आली.

१८८५ च्या सुमारास मराठी कविता जन्माला आली. १८७४ ते १९२० त्यात ही १८८६ ते १९२० हा कालखंड अर्वाचीन मराठी कवितेच्या इतिहासात महत्वाचा आहे. या वेदान्त विषयक ग्रंथापेक्षा त्याकाळी जी भक्तियुक्त पदे जन्मास आली ती आज या घटकेसही समाजात प्रिय आहेत. या भाव-गीतांच्या प्रणेत्यात क-हाडचे विठोबा आण्णा दप्तरदार हे अग्रेसर होते. मराठे शाहीची अवाढव्य इमारत खचून तिच्याजागी इंग्रजीचा नवा पाया घातला गेला व मधल्या संक्रमण काळात या दोन जुन्या काव्य परंपरागत धुगधुगी होती. परंतु इंग्रजी राजवटीचा प्रभाव केवळ राजकारणापुरतताच मर्यादित नव्हता. तो थोड्या अवधीत धर्म, समाज, व्यापार, व्यवहार यांच्यापर्यंत पसरला. शिवाय इंग्रजी राज्याबरोबर या देशात अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक फेरबदल घडून आले.

जुन्या शाहिरी परंपरेचा शेवट:

इ.स.१८१८ मध्ये मराठेशाहीचा अंत झाला आणि पुढील पावशतकात तिच्या ऐन आमदानीत ऐश्वर्याचा व नाना विधविलासांचा मनमुराद सुखोप-पभोग घेतलेल्या जुन्या शाहिरी परंपरेचा ही अस्त झाला. स्वकीयांची सत्ता नष्ट होऊन परकीयांची गुलामी महाराष्ट्राच्या नशीबी येताच त्यांच्या समाजात विलक्षण स्थित्यंतर घडून आले. ही उलथापालथ अनेक बाजूंनी व अनेक प्रकारांनी होत होती. हा महाराष्ट्राच्या जीवनातील संक्रमणाचा काळ

होता. हे संक्रमण यथावकाश होत होते. या संक्रमण कालातच प्रभाकर व परशुराम हे शाहिरी परंपरेतील दोघे शेवटचे शाहिर होऊन गेले. तर एकूण साहित्यात पराक्रमाचे पोवाडे कमी आहेत. मात्र रंगबाजी लावण्यांची नुसती रेलचेल आहे. "यथा राजा तथा प्रजा" या न्यायाने शृंगारिक लावण्यांची निपज मुबलक व्हावी हे तत्कालीन पेशव्यांच्या ढंगदार जीवन-चरित्राकडे दृष्टिक्षेप टाकल्यास स्वाभाविकच वाटते.

या प्रचंड उलथापालथीत मराठी कवितेला पुढील पाऊणशे वर्षांत हळूहळू नवे इंग्रजीवळण मिळत गेले. अर्वाचीत कवितेची प्रकृती देशी असली तरी तिच्यावर इंग्रजी संस्कृतीची जबरदस्त छाप आहे. पुढील काळामध्ये जी वाङ्.मय निर्मिती झाली ती पुष्कळशी सरकारी प्रेरणेने व पारितोषिकांच्या प्रलोभनाने झाली होती. या नव्या युगाची पहिली प्रातिनिधीक परंपरा "पंडित कवी"ची होय. हे "पंडित कवी" संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषांत निपूण होते. त्यांनी भाषांतर करताना पद्योसाठी संस्कृत व गद्यासाठी इंग्रजी ग्रंथ निवडले आहेत. या कवींना "शास्त्री" म्हणत. परशुराम तात्या गोडबोले, कृष्णाशास्त्री राजवाडे, कृष्णाशास्त्री चिपळूणकर गणेशशास्त्री लेले, पांडुरंग शास्त्री पारखी इ. पंडित कवी या काळामध्ये होऊन गेले. आधुनिक कवींच्या आरंभीच्या या पंडित परंपरेचे संस्मरणीय व महनीय कार्य हे की तिने सर्वसाधारण मराठी वाचकवर्गास अभिजात संस्कृत साहित्यातील काव्य नाटकातला नवरस चाखविला आणि भक्ति परंपरेचा पुराणरथ आध्यात्मिक व पौराणिक चाकोरीतून चालला होता त्याला नवीन मार्ग दाखविला.

पंडित परंपरेचे पुष्कळ वाङ्.मय "दक्षिणा प्राईज कमिटी"च्या प्रोत्साहनामुळे व "मेहेरबान" दायरेक्तर ऑफ पब्लिक इंस्रक्शन" यांच्या खास

हुकूमामुळे तयार झाले होते. "दक्षिणा प्राईज कमिटी"ने विषय जाहीर करावयाचा आणि उमेदवार कवींना तो घ्यावयास लावावयाचा हा साराच प्रकार चमत्कारिक तसाच अस्वाभाविक होता. यापैकी कुंटे यांचा "राजा शिवाजी" इतिहास प्रसिद्ध शिवाजीप्रमाणे आधुनिक मराठी कवितेच्या इतिहासात अनेक क्रांतीकारक व युगप्रवर्तक आहे.

या काळातील आणखी एक नवीन काव्यप्रवृत्ती "नाटकी कविता" ची होय. इ.स. १८४३ मध्ये पौराणिक आख्यानाच्या आणि हरिदासी कथा कीर्तनाच्या धर्तीवर सांगलीचे विष्णुदास अमृत भावे यांनी "नाटकी कविता" निर्माण केली. इंग्रजी राजवटीच्या प्रारंभी कवितेत दोन प्रवाह होते. संस्कृत संप्रदायातील शास्त्री पंडितांच्या कवितेचा एक प्रवाह दुसरा प्रवाह इंग्रजी संप्रदायातील नवशिक्षित कवींचा होता. या परंपरे-प्रमाणेच या कालखंडातील जनतेच्या जीवनाशी समरस होणाऱ्या लोक-कवींच्या परंपराही होती. यांची भूमिका समाजसेवकाची होती. ते अगोदर समाजसेवक होत व नंतर कवी होत.

साहित्यशास्त्राच्या कसोटीवर घासून पाहिल्यास ते काव्य या पदवीस पात्र ठरणार नाही. परंतु तत्कालीन समाजातील अनिष्ठ रुढी, केशवपनसारख्या सामाजिक समस्या, बालविवाह, जातिबहिष्कार इ. अनेक नाना प्रकारच्या वेडगळ समजुती, अंधश्रध्दा यातून समाजाला ज्ञानाचा मार्ग दाखविण्यासाठी, समाज सुधारणासाठी जोतिबा फुलेंच्यासारखे खंदे खंबीर पुढारी पुढे येत होते. "ब्राह्मणांचे कसब", "शिवाजीचा पवाडा" हे जोतिबांचे ग्रंथ पद्यात्मक आहेत. तसेच त्यांनी पद्यात्मक "अखंड"ची ही रचना केली.

धार्मिक, सामाजिक कवितांप्रमाणे अव्वल इंग्रजीत काही राजकीय कविताही लिहिल्या गेल्या आहेत. परंतु त्यात फारसे काव्यगुण नाहीत.

या कालखंडात प्राधान्याने लिखाण झाले ते समाजामुळेच. काळाची गरज ही अर्थात तशीच होती. "नावल व नाटक" विषयक निबंध हा वाङ्- मयविषयक विचार मांडणारा कालदृष्टया पहिला निबंध म्हणता येईल.

एकोणिसाव्या शतकातील बदलू पाहणाऱ्या या काव्यविषयक जाणिवेचा शोध आपणांस घ्यावयाचा आहे. ही प्रस्तुत शोध निबंधाची प्रमुख भूमिका आहे. १) दादोबा पांडुरंग, २) रा.भि. गुंजीकर, ३) म.मो. कुंटे, आणि ४) वि.कृ. चिपळूणकर यांच्या काव्य विषयक लेखनाच्या अनुषंगाने एकोणिसाव्या शतकातील मराठीतील काव्यविचाराचे स्वरूप शोधावयाचे आहे.

समारोप:
======

प्रस्तुत विवेचन करण्याचे कारण ज्या वाङ्मय विषयक (काव्यविषयक) विचारांचा अभ्यास करावयाचा आहे तो कोणत्या प्रकारच्या वाङ्मयावर आधारीत होता याची कल्पना यावी एवढयाच दृष्टीकोणातून. यादृष्टीनेच एकोणिसाव्या शतकातील वाङ्मयनिर्मितीचे विवेचन केले आहे. यामध्ये सुरुवातीला वाङ्मयनिर्मितीच्या प्रेरणा ज्या पर्यावरणात आहेत ते शोधण्यासाठी त्या कालखंडातील सामाजिक, राजकीय वातावरणाचा आढावा घेतला आहे. तसेच प्रस्तुत कालखंडाचे सर्वसामान्य स्वरूप कसे होते. त्याचबरोबर इंग्रजी राज्यकर्त्यांचे आगमन व त्याचा एतद्देशीयांच्या धर्म, समाज, राजकारण इत्यादीवर झालेला परिणाम व जीवनाविषयी दृष्टीकोणात झालेला बदल. यासर्वांचा सांगोपांग परामर्श घेतला आहे. नव्या राजवटीच्या प्रभावातून व परिणामातून यावेळच्या सर्वच वाङ्मय निर्मितीत नवेपणाच्या खुणा दिसून येतात.

......

संदर्भ

१.	चिपळूणकर, वि.कृ.	निबंधमाला मराठी भाषेची सांप्रतची स्थिती, पृ. २.
२.	तत्रैव,	पृष्ठ ४१३.
३.	जोग रा.श्री., [संपा.]	मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड चौथा, प्रकाशक डॉ. भीमराव कुलकर्णी, पुणे १९६५, पृष्ठ ९५.
४.	तत्रैव,	पृष्ठ १०३.

....